आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२२ जून २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- स्पर्धा परीक्षांमधल्या गैरप्रकारांबद्दल १० वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद करणारा कायदा आजपासून लागू

- व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सीईटी संदर्भात अफवांवर विश्वास न ठेवण्याचं राज्य सरकारचं आवाहन

- ओबीसी आंदोलनकर्ते लक्ष्मण हाके यांचं उपोषण स्थगित

- जातनिहाय जनगणनेला देवेंद्र फडनवीस यांचा पाठिंबा असल्याचा छगन भुजबळ यांचा दावा, लोकसभा आणि विधानसभेच्या जागांमध्ये ओबीसींना आरक्षण देण्याचीही मागणी

**आणि**

- टी-२० क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज सुपर ८ मध्ये भारताचा सामना बांगलादेशबरोबर

**<><><><><>**

विविध स्पर्धा परीक्षांमधल्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारनं कठोर कायदा केला आहे. दोषींना १० वर्षे पर्यंत तुरुंगवास आणि १ कोटी रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद आहे. या तरतुदी आजपासून लागू होत असल्याचं राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत म्हटलं  आहे. केंद्रीय लोकसेवा आयोग, कर्मचारी निवड आयोग, नॅशनल टेस्टिंग एजन्सी NTA, रेल्वे भरती आणि बँकिंग

भरती परीक्षा अशा विविध सार्वजनिक परीक्षांमध्ये होणार्या  अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी या तरतुदी लागू असतील.

**<><><><><>**

एन टी ए अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या परीक्षा पारदर्शी, सहज आणि योग्य वातावरणात पार पडाव्यात यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं उच्चस्तरीय तज्ञ समितीची  स्थापना केली आहे. इसरोचे माजी अध्यक्ष डॉक्टर के राधाकृष्णन या सात सदस्यीय समितीचे अध्यक्ष असतील. कार्यक्षमता वाढवून एन टी ए च्या चुकीच्या पद्धती मोडून काढत परीक्षा प्रक्रियेत सुधारणा, संकलित माहिती सुरक्षा तसंच संस्थेची रचना आणि कामकाज याची समीक्षा समिती करणार आहे. एन टी ए च्या कामकाजाचं मूल्यांकनही समिती करणार आहे. आपला अहवाल सादर करण्यासाठी समितीला दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांचं हित आणि त्यांचं उज्ज्वल भवितव्य याला सरकारचं सर्वोच्च प्राधान्य असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी समितीच्या स्थापनेनंतर म्हटलं आहे.

**<><><><><>**

व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठीची प्रवेश परीक्षा पारदर्शक असून विद्यार्थी आणि पालकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाचे आयुक्त दिलीप सरदेसाई यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत केलं. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने औषध निर्माणशास्त्र आणि कृषी शिक्षण अभ्यासक्रमासाठी परीक्षा घेतली होती. यात समान गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना वेगवेगळे पर्सेंटाईल दाखवल्याचा आक्षेप चुकीचा असल्याचं सरदेसाई यांनी स्पष्ट

केलं. ही परीक्षा वेगवेगळ्या दिवशी प्रत्येकी दोन सत्रात घेतली होती. त्यामुळे विविध सत्रात समान गुण मिळालेल्या उमेदवारांना वेगवेगळे पर्सेंटाईल मिळाले आहेत. तसंच उमेदवारांना उत्तर तालिकेप्रमाणे काढलेले गुण मिळाले नाहीत, हा आक्षेपही चुकीचा असल्याचं सरदेसाई यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी आज राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन एमएच सीईटी परीक्षेतल्या कथित गोंधळप्रकरणी चर्चा केली. तसंच या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्याची मागणी केली.

**<><><><><>**

ओबीसी आंदोलनकर्ते लक्ष्मण हाके यांचं जालना जिल्ह्यातल्या वडीगोद्री इथं सुरू असलेलं उपोषण आज स्थगित करण्यात आलं आहे. सरकारच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनंतर वार्ताहर परिषदेत हाके यांनी ही घोषणा केली. आपल्या दोन मागण्या मान्य झाल्या असून मराठा आरक्षणासाठीचा सग्यासोयऱ्यांचा अध्यादेश सर्वपक्षीय बैठक झाल्याशिवाय काढणार नाही, असं आश्वासन आपल्याला सरकारने दिल्याचं लक्ष्मण हाके यांनी सांगितलं. तसंच खोटी कुणबी प्रमाणपत्रं देणारे आणि घेणारे या दोघांवरही कारवाई करण्याचं आश्वासन सरकारने दिल्याचं त्यांनी सांगितलं. मराठा आरक्षण प्रकरणी लाखो हरकती नोंदवल्या गेल्या आहेत. या हरकतींवर काय कारवाई झाली याची श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणीही हाके यांनी केली.

दरम्यान, मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यावं तसंच लोकसभा आणि विधानसभेत ओबीसींना आरक्षण द्यावं, अशी मागणी मंत्री छगन भुजबळ यांनी

उपोषणस्थळी बोलताना केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही जातनिहाय जनगणनेला पाठिंबा दिल्याचा दावा भुजबळ यांनी केला.

**<><><><><>**

ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला स्वतंत्र प्रवर्ग तयार करून आरक्षण द्यावं ही रिपब्लिकन पक्षाची भूमिका असून लक्ष्मण हाके यांच्या आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याचं केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मराठा आरक्षण आणि सगेसोयरे कायद्याची अंमलबजावणी या दोन मागण्यांबाबत राज्य शासनावर आमचा विश्वास असून, १३ जुलै पर्यंत आम्ही वाट पाहणार, अशी प्रतिक्रिया मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी दिली आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं माध्यमांशी बोलत होते. मराठा समाजाला आजवर दिलेल्या कुणबी नोंदी रद्द होऊ देणार नाही, असंही जरांगे म्हणाले.

**<><><><><>**

राज्य सरकारनं पाणीपट्टीत दहापट वाढ केल्याची बातमी काँग्रेस पसरवत आहे, मात्र ही संपूर्ण दरवाढ महाविकास आघाडीच्या काळात झाली होती, असं स्पष्टीकरण उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिलं आहे. २९ मार्च २०२२ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने जारी केलेल्या आदेशानुसार, महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळातच ही दरवाढ झाली. मात्र शेतकऱ्यांना भूर्दंड पडू नये, यासाठी ही दरवाढ स्थगित करण्याचं काम अंतिम टप्प्यात आहे, येत्या आठवड्यातच ते पूर्ण होईल, असं फडनवीस यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

नक्षल्यांच्या विभागीय समितीचा सदस्य गिरीधर आणि त्याची पत्नी संगीता यांनी आज गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. गेल्या चार वर्षांत गडचिरोली जिल्ह्यातून कोणीही नक्षल दलममध्ये भरती झाले नाही, ही चांगली गोष्ट असल्याचं फडनवीस म्हणाले.

<><><><><>

राज्यांना दिला जाणारा करांचा हिस्सा, वित्त आयोग अनुदान आणि वस्तू आणि सेवा कर भरपाई थकबाकीच्या माध्यमातून केंद्राकडून राज्यांना मिळणारं सहाय्य राज्यांमध्ये विकासाला गती देण्याच्या उद्देशाने प्रेरित असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीत आयोजित सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अर्थमंत्र्यांच्या बैठकीत बोलत होत्या. राज्यांमध्ये भांडवली गुंतवणुकीत वाढ होण्यासाठी विशेष सहाय्यता योजनांचा लाभ घेण्याचं आवाहन त्यांनी सर्व राज्यांना यावेळी केलं.

<><><><><>

वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५३ वी बैठक केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झाली. वस्तू आणि सेवा कर परिषदेची शेवटची बैठक गेल्या वर्षी ऑक्टोबर मध्ये झाली होती.

<><><><><>

ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर राज्यात विशेषतः सोयाबीन लागवड क्षेत्रामध्ये डीएपी या रासायनिक खताचा तुटवडा जाणवू लागला आहे. शेतकऱ्यांनी डीएपीला पर्याय म्हणून मोठ्या प्रमाणात उपलब्ध संयुक्त आणि मिश्र खतांचा वापर करावा

असं पुणे कृषी  निविष्ठा आणि गुणनियंत्रण विभागाचे कृषी संचालक  विकास पाटील यांनी सांगितलं. राज्य सरकारनं यंदाच्या खरीप हंगामासाठी केंद्राकडे पाच लाख टन डीएपी खतांची मागणी केली होती. आतापर्यंत ३ लाख १०हजार टन डीएपी खत मिळालं असून त्यापैकी १ लाख ५० हजार टन खताची विक्री झाली आहे.

**<><><><>**

भाजपा नेत्या आणि माजी केंद्रीय राज्यमंत्री सुर्यकांता पाटील यांनी आज आपला पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा प्रदेशाध्यक्षांकडे सोपवला आहे. भाजपाने गेल्या दहा वर्षात आपल्याला कोणतीही मोठी जबाबदारी अथवा संधी दिली नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

नाशिक- त्र्यंबकेश्वर येथील संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचं आज नाशिक शहरात जोरदार स्वागत करण्यात आलं. पालखी पंचवटीतील गणेशवाडी येथील भाजी मंडईत विसावली. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालखीच्या ठिकाणी भेट देऊन वारकऱ्यांशी संवाद साधला.  या दिंडी सोहळ्यासाठी शासकीय अनुदानाऐवजी त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर दरम्यान पालखी मार्ग प्रशस्त करावा, अशी मागणी यावेळी वारकऱ्यांनी केली.

**<><><><>**

शिक्षकांना शिक्षणबाह्य कामं न देण्याबाबत सरकार विचार करत असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज अहमदनगर इथं मुख्याध्यापक, शिक्षक मेळाव्यात बोलताना सांगितलं. शिक्षकांनी फक्त शिकवण्याचं काम केलं पाहिजे असं मुख्यमंत्री म्हणाले. तसंच २००५ पूर्वी सेवेत आलेल्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि बांगलादेश यांच्यात सुपर आठ फेरीतील सामना होणार आहे. अँटीग्वा इथं रात्री आठ वाजेपासून हा सामना खेळवला जाणार आहे. भारतानं सुपर आठ फेरीतील अफगाणिस्तानविरूध्दचा आपला पहिला सामना जिंकला असून बांगलादेशला ऑस्ट्रेलियाकडून पराभव स्वीकारावा लागला आहे.

या स्पर्धेत आज सकाळी झालेल्या सामन्यात वेस्ट इंडीजनं अमेरिकेचा नऊ गडी राखून पराभव केला. उद्या ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान यांच्यात सामना होणार आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी तर मध्यमहाराष्ट्रात काही ठिकाणी पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**//<><><><><>//**